दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**कृत्रिम तलावांची महापालिका अतिरिक्त आयुक्त(१) राजेंद्र अहिवर यांनी केली पाहणी**

**ठाणे(१२)**: गणेश मुर्ती विसर्जनासाठी ठाणे महापालिकेच्या वतीने शहरात कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली असून या सर्व कृत्रिम तलावांची महापालिका अतिरिक्त आयुक्त(१)राजेंद्र अहिवर यांनी पाहणी केली.दरम्यान विसर्जन काळात महापालिकेची संपूर्ण यंत्रणा अद्यावत ठेवण्याचे कार्यकारी अभियंत्यांना त्यांनी आदेश दिले.

यावेळी वागळे इस्टेट परिसरातील रायलादेवी, उपवन येथील पायलादेवी, बाळकुम रेवाळे,खारेगाव आदी कृत्रीम तलावांची त्यांनी पाहणी केली.

श्री गणेश मुर्तीच्या विसर्जनामुळे शहरात ठाणे महापालिकेच्यावतीने वागळे इस्टेट परिसरातील रायलादेवी तलावाच्या बाजूला 50 x 30 फुटाचे आणि 10 फुट खोलीचे दोन कृत्रीम तलाव निर्माण करण्यात आले आहेत. तर उपवन येथे पालायदेवी मंदिराशेजारी 47 x 16 फुट लांब आणि अडीच मीटर खोलीचा व आंबेघोसाळे तलाव येथे 30 x 60 फुट या आकाराचा, निळकंठ वुडस् टिकुजीनी वाडी, बाळकुम रेवाळे कृत्रीम तलाव व खारेगांव येथेही कृत्रीम तलाव निर्माण करण्यात आले आहेत.

या सर्व या कृत्रीम तलावाच्या ठिकाणी आरतीस्थाने, निर्माल्य कलश, वैद्यकीय पथक, अग्निशमन दल, प्रखर विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपण यंत्रणा आदी सुविधा विसर्जन काळात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जेणेकरुन भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही.

या पाहणी दौऱ्याला उप नगर अभियंता अर्जुन अहिरे,कार्यकारी अभियंता मनोज तायडे, प्रकाश खडतरे,सुधीर गायकवाड, हणमंत हेमेलवाड, चेतन पटेल आदी उपस्थित होते.